Vol 5 Issue 12 Jan 2016
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) [Yr. 2014]

ISSN: 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF) Volume - 5 | Issue - 12 | Jan - 2016





# "भंडारा जिल्हयातील प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्यांचे अध्ययन"

अर्चना आ. निखाडे
(गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख)
एन.पी.डबलू आर्ट्स. सायन्स कॉलेज मूरमाडी/तूप.

**सारांश :-**

देशाची धूरा सांभाळण्याचे महत्वाचे कार्य आपल्या नवपिढीला करावयाचे आहे परंतू ज्या बालकांमध्ये वर्तनसमस्या असतील त्या वर्तनसमस्येवर वेळीच उपयोजना केली तर पुढचा भावी काळ सुखावह राहील व बालकांच्या भावी विघातक प्रवृत्तीना प्रतिबंध घालता येईल. त्यासाठी अधिकाधिक प्रमाणात उपाययोजना करण्याच्या हेतुने या विषयाची निवड केलेली आहे.

प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये वर्तणूक समस्या निर्माण होतात त्यामुळे त्यांच्या एकूण व्यक्तीमत्वावर अयोग्य परिणाम होऊन त्यांच्या सर्वांगिण विकासात अडचणी निर्माण होतात म्हणून विद्यार्थ्यांचे शालेय तसेच शालाबाहय वर्तनाचा अभ्यास करून त्यांच्या समस्या कोणत्या आहेत? त्या निर्माण होण्याची कारणे कोणती? त्या वर्तनसमस्यांचे परिणाम कोणकोणावर होतात.? व त्या समस्या सोडविण्याकरीता पालकांची, शिक्षकांची भुमिका कशी महत्वपूर्ण असते हे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रस्तुत विषय अभ्यास करतांना भंडारा जिल्हयातील एकुण ७ तालुक्यांपैकी ४ तालुक्यातील एकूण १२ शाळेतील याप्रमाणे इयत्ता १ ली, २ री, ३ री, ४थी व ५ वी याप्रमाणे या वर्गातील एकूण ३४८ विद्यार्थ्यांचे (मुले व मुली) यांच्यातील वर्तनसमस्यांचे अध्ययन करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये समरुप होऊन त्यांच्या पालकांना व शिक्षकांना विद्यार्थ्यांशी संबंधित वर्तणूक अनुसूची देऊन मुलाखतीद्वारे प्रश्नावली भरुन घेतल्या या प्रश्नावलीवर त्यांना जे गुण प्राप्त झाले त्याकरिता t–test वापर करण्यात आला.

प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्यांचे विद्यार्थ्यांवर, त्यांच्या सर्वांगिण विकासावर अयोग्य परिणाम होतो. म्हणून या समस्या दूर करण्यासाठी पालक –बालक संबंध व शिक्षक – बालक संबंध अत्यंत प्रेमाचे, विश्वासाचे असणे आवश्यक आहे.

## 1) प्रस्तावना :–

आजचा बालक हा राष्ट्राचा भविष्य असून त्यांच्या विकासावर संपुर्ण राष्ट्राचा विकास अवलंबून आहे. या देशाची धुरा उदया त्यांच्याच खांदयावर येणार असल्यामुळे बालंकावर कुटुंबिय सदस्य मंडळींनी योग्य प्रकारचे संस्कार करून देशाचे आदर्श नागरीक घडविणे ही केवळ कुटुंबाचीच नव्हे तर समाज, शासन व संबंधित संस्थांची देखील जबाबदारी आहे. १३ वर्ष बालक हा आपल्या आई–वडीलांच्या छत्रछायेखाली वावरत असतो. नंतर त्यांच्या भाग्योदयास सुरवात होते. म्हणून त्यांना योग्य वळण लावण्याचे काम, चांगल्या सवयी लावण्याचे महत्वपूर्ण काम सर्वांनाच म्हणजे कुटुंबातील मोठी मंडळी, शाळेतील शिक्षक तसेच अन्य इतरही लोकांची जबाबदारी आहे. त्यांच्यावर वाईट प्रकारचे संस्कार होणार नाहीत याकडे सर्वानी लक्ष दिले तर राष्ट्राचा एक सुदृढ बालक तयार होईल.

विकास ही अतिशय गुंतागुंतीची प्रदिर्घ अशी प्रक्रिया आहे. विकासाच्या प्रदिर्घ प्रवासात प्रत्येक व्यक्तीला अनेक महत्वपुर्ण अवस्थांमधून जावे लागते.

शेक्सपियरने म्हटल्याप्रमाणे 'जग' नावाच्या रंगभूमीवर येणारा प्रत्येक जीव वयोमानाप्रमाणे वेगवेगळया भूमिका बजावत असतो. यातील बाल्यावस्थेचे वय हे प्राथमिक औपचारिक शिक्षणाची सुरूवात असते. या वयात मुले प्राथमिक शाळेत जाऊन बाहेरच्या जगाचा विविध अनुभव घेतात.

बालकांच्या जीवनात कुटुंबाचे महत्वपूर्ण स्थान निश्चित होते. प्रथमत: बालकांचा कुटुंबातील व्यक्तीबरोबर सबंध येत असतो. कुटुंबातील सदस्यांचे परस्परांशी असलेल्या सबंधांचा बालकांवर परिणाम झालेला दिसून येतो. बालक हे निरिक्षण व अनूकरणाने शिकत असल्याने या सदस्यांच्या वर्तणुकीचा प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष परिणाम बालकांवर होतो आणि यातूनच बालकांचे वर्तन निश्चित होत असते.

लहान मुलं ही कोवळया वेलीप्रमाणे असतात. त्यांना जसा आधार दयाल त्या आधाराने ते वाढत असतात. लहान मुलं ही संस्कारक्षम असतात. व या वयात त्यांना चांगल्या सवयी लागल्या तर त्यांच्या जीवनात क्षणोक्षणी उपयोगी पडतात. व आयुष्यभर टिकूण राहतात. बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी पालक—बालक संबंध फार महत्वाचे असून या सबंधामुळेच बालकांचे व्यक्तिमत्व विकासित होण्यास मदत होते.

बालक ही राष्ट्राची संपत्ती असून अनमोल ठेवा आहे. राष्ट्राचे भवितव्य बालकांची स्थिती पाहूनच ठरविता येवू शकते. या संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी सरकारचे सुध्दा प्रयत्न सुरूच आहेत. अशा परिस्थितीत बालकांचे वर्तन कसे आहे? त्यांच्या सवयी कशा आहेत? त्यांच्यात वर्तनसमस्या दिसतात काय? याचा परिपूर्णपण आढावा शाळेतील शिक्षक व कुटुंबातील पालकांनी घ्यायला पाहिजे व त्या समस्या सोडविण्यासाठी तसेच प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्या वर्तन समस्याचे कुटुंबावर, मुलांच्या सर्वागिण विकासावर, समाजावर शालेय मित्रपरिवारावर कसा परिणाम होतो? याचा अभ्यास केला पाहिजे म्हणून प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या वर्तणुक समस्यांचे अध्ययन करणे आवश्यक वाटले.

### *2) उदि्ष्टये :—*

१) प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांचे मापन करणे
२) प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या समस्यांची तुलना करणे.

### *3) गृहीतकृत्ये :—*

१) पहिल्या व दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या समस्यांमध्ये सार्थक अंतर असते.
२) दुसऱ्या व तिसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या समस्यांमध्ये सार्थक अंतर असते.
३) तिसऱ्या व चवथ्यावर्गातील विद्यार्थ्यांच्या समस्यांमध्ये सार्थक अंतर असते.
४) चवथ्या व पाचव्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या समस्यांमध्ये सार्थक अंतर असते.
५) पहिल्या व पाचव्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या समस्यांमध्ये सार्थक अंतर असते.

### *4) साहित्य अवलोकन :—*

### *1) वर्तन समस्येची व्याख्या :—*

Valentine यांच्या मता प्रमाणे ''ज्या बालकांचे वर्तन आणि व्यक्तिमत्व एखादया गोष्टीमध्ये गंभीर स्वरूपाचे अप—सामान्य असते''. सर्वसाधारणपणे समाजमान्य वर्तनापेक्षा वेगळे वर्तन करणारे बालक म्हणजे समस्यात्मक बालक होय.

### *2) वर्तन समस्येची कारणे :—*

बालकांमध्ये निर्माण होणाऱ्या वर्तन समस्यांचा विलियम्स यांनी सखोल अभ्यास केला. त्यांनी वर्तनसमस्या निर्माण होण्यास कारणीभूत असणारे तीन घटक श्शोधून काढले.
१) कौटूंबिक वातावरण
२)शालेय वातावरण
३) सामाजिक व वैयक्तिक वातावरण

या तिन्ही वातावरणाचा अयोग्य परिणाम बालकांवर होत असतो. त्यातूनच विविध प्रकारच्या वर्तन समस्या उद्भवतात.

### *3) वर्तन समस्यांचे प्रकार :—*

***बालकांमध्ये सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या वर्तन समस्या पुढीलप्रमाणे :—***

| | | |
|---|---|---|
| १) अंगठा चोखणे | ६) खोटे बोलणे | ११) शारीरिक हालचाली |
| २) अंथरूण ओले करणे | ७) चोरी करणे | १२) अध्ययन समस्या |
| ३) नखे कुरतडणे | ८) भीती | १३) लैंगिक समस्या |
| ४) संतापाचा उद्रेक होणे | ९) अखाद्य भक्षण | |
| ५) हट्टीपणा | १०) दिवास्वप्न | |

इत्यादि समस्या विद्यार्थ्यांमध्ये आढळून येतात.

### *1) प्रेमला काळे यांनी सांगितल्याप्रमाणे :—*

शालेय परिस्थती आणि बुध्दीविकास याविषयी शाळा कोणत्या दर्जाची आहे. त्यांचे बौध्दिक क्षमतेवर नकळत परिणाम होतो. शाळा जर सर्व दृष्टीने समृध्द असेल तर मुलांच्या माहितीत अधिक भर पडते. त्यांच्या बुध्दिला धार येते.

### *2) डॉ. मॉरीलिन हेन्स (2 मे 2008) :–*

नखे कुरतडणे ही तणावात केली जाणारी कृती होय. तणावात केले जाणारे विचार हे बालकांचे विचार बदलवण्यात मदत करतात. शालेय बालकांमध्ये १० वर्ष वयोगटातील ६० टक्के मुले ही नखे खातांना दिसून येतात.

### *3) Courtesy of the American Academy of pendiatrcis ( 10 मार्च 2002) रू.*

बहूधा मुलं हे पालकांना खुश करण्यासाठी खोटं बोलतात. तसेच आपल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सुध्दा खोटं बोलतात. आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी गैरवर्तन करतात. ज्या मुलांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता आहे. अशी मुले जास्त प्रमाणात खोटी बोलतांना दिसून येतात.

***4) फ्रँक मॅक्काल :–*** जेव्हा बालकांच्या इच्छा पूर्ण होत नाही किंवा उद्देश पूर्ण होत नाही तेव्हा त्यांना राग यतो. तणाव एकाकीपणा, भावनापूर्ण नात्याची गरज, वैफल्य, भूक, दु:खी, थकवा अतिउत्तेजना, शारीरिक दुर्बल्य , अन्याय संप्रेरकाचा कमी–जास्त पणा इ. समस्यांमुळे शाळेत जाणाऱ्या बालकांना राग येतो. अशावेळेस बालकांच्या भावनांना समजून योग्य वाट करून द्यावी. हवी ती सुरक्षितता द्यावी त्यामुळे त्यांच्यातील राग येण्याची क्रिया हळूवार नियंत्रणात येईल.

### *5) बेली व जोन्स :–*

कुटुंबाच्या सामाजिक व शैक्षणिक दर्जावर बालकांचा बुध्दीविकास अवलंबून असतो असा ***निष्कर्ष*** निघाला. आई वडिलांचे शिक्षण सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक दर्जा, वडिलांचा व्यवसाय इ. घटक बौध्दिक विकासावर परिणाम करतात असे दिसून येते.

### *1) नमुन्याचा आकार :–*

प्रस्तुत विषय अभ्यास करतांना भंडारा जिल्हयाची निवड करण्यात आली. भंडारा जिल्हा शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टया प्रसिद्ध व प्रगतशील आहे. भंडारा जिल्हयातील एकूण ७ तालुक्यांपैकी दैवनिदर्शन पध्दतीने ४ तालुक्यांची निवड करून या तालुक्यामधील एकूण १२ शाळांची निवड दैवनिर्शन पध्दतीने केली.

या निवडलेल्या शाळेतील पहिल्या वर्गातील ७६, दुसऱ्या वर्गातील ४९ आणि तिसऱ्या वर्गातील ७७, चवथ्या वर्गातील ७६ आणि पाचव्या वर्गातील ७० अश्याप्रकारे एकूण ३४८ विद्यार्थ्यांचे अध्ययन केलेले आहे.

### *2) तथ्य संकलन पध्दती :–*

यासाठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्येचे अध्ययन करण्यासाठी सर्वात प्रथम शाळेशाळेत जावून विद्यार्थ्यांमध्ये एकरुप होऊन त्यांना प्रश्न विचारले. त्यांचे सर्वेक्षण करून त्यांच्या पालकांकडून संबंधित शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या वर्तनाच्या संबंधित असलेली वर्तणूक समस्या अनुसुची द्वारे मुलाखत घेऊन प्रश्नावली भरून घेतली यासाठी क्षेत्र अभ्यास व बैठा अभ्यास या दोन्ही पध्दतीचा उपयोग केला. वर्गात असलेल्या मुले व मुली या दोन्ही गटाचा अभ्यास केला. यात श्जश्.जमेजश् चा वापर करण्यात आला.यासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीचा सुध्दा उपयोग केला.

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक शाळेतील १ ते ५ व्या वर्गातील मुले आणि मुली या दोन समुहांमध्ये तुलना करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रश्नावलीच्या सांख्यिकीय विश्लेषणासाठी प्राप्त झालेल्या गुणांचे मध्यमान, प्रमाणविचलन आणि श्'t' मुल्यांच्या सहाय्याने विश्लेषण करण्यात आले आहे.

***सारणी क्र. 1***

***शिक्षकांच्या मुल्यांकनानुसार वर्ग 1 आणि 2 ते 5 या विद्यार्थ्यांच्या समस्यांच्या तुलनांचे मध्यमान, प्रमाणविचलन आणि 't' - मुल्य दर्शविणारी सारणी***

| वर्ग | एकूण गुण | | 't' मुल्य | df (स्वतंत्र अंश) |
|---|---|---|---|---|
| | मध्यमान | प्रमाणविचलन | | |
| वर्ग १ | २१.०७ | १२.१२ | ०.५६ | १२३ |
| वर्ग २ | १९.९४ | ९.५६ | | |
| वर्ग १ | २१.०७ | १२.१२ | १.८६ | १५१ |
| वर्ग ३ | १७.८१ | ९.४७ | | |
| वर्ग १ | २१.०७ | १२.१२ | ३.६५ | १५० |
| वर्ग ४ | १४.३९ | १०.४२ | | |
| वर्ग १ | २१.०७ | १२.१२ | २.४९ | १४४ |
| वर्ग ५ | १६.३६ | १०.६५ | | |

*p<0.05,**p<0.01

### स्पष्टीकरण :–

वेगवेगळया वर्गात शिकणाऱ्या विद्‌यार्थ्यांमध्ये वर्तनसमस्यांच्या प्रमाणामध्ये अंतर दिसून येते का हे बघण्यासाठी प्रत्येक वर्गातील वर्तनसमस्या प्रश्नावलीच्या गुणांची तुलना करण्यात आली आहे.

पहिल्या वर्गात शिकणाऱ्या गुणांचे मध्यमान २१.०७ आणि प्रमाण विचलन १२.१२ आहे. दुसऱ्या वर्गात शिकणाऱ्या विद्‌यार्थ्यांच्या गुणांचे मध्यमान १९.९४ आहे. आणि प्रमाण विचलन ९.५६ आहे. या मध्यमानाचे श't' मुल्य ०.५६ असून स्वतंत्र अंश १२३ आहे. प्राप्त श't' मुल्य १२३ स्वतंत्र अंश(df) साठीच्या ०.०५ लक्षणीय पातळीवरच्या श't' मुल्यांपेक्षा लहान आहे. त्यामुळे ०.५६ श't' मुल्य ०.०५ लक्षणीय पातळीवर सार्थक नाही. वर्ग तीनच्या विद्‌यार्थ्यांचे मध्यमान १७.८१ आणि प्रमाण विचलन ९.४७ आहे. वर्ग १ ली आणि वर्ग ३ री च्या मध्यमानाची तुलना करण्याकरिता श्जश मूल्यांची गणना करण्यात आली हे श्जश मूल्य १.८६ असून हे श't' मुल्य १५१ (df) करिता एकपुच्छ ०.०५ लक्षणीय पातळीच्या श्जश मुल्यांपेक्षा अधिक आहे म्हणून हे ०.०५ लक्षणीय पातळीवर सार्थक आहे. यावरून असे स्पष्ट दिसून येते की, वर्ग १ ली व वर्ग ३ री च्या विद्यार्थ्यांच्या वर्तनसमस्या समान नाहीत म्हणजेच त्यामध्ये सार्थक अंतर आहे. वर्ग चवथीच्या विद्‌यार्थ्यांच्या गुणांचे मध्यमान १४.३९ आणि प्रमाण विचलन १०.४२ आहे. वर्ग १ ली आणि वर्ग ४ थी च्या विद्‌यार्थ्यांच्या मध्यमानाची तुलना केली असता त्याचे श't' मुल्य ३.६५ असून हे मुल्य १५० (df) साठी ०.०१ लक्षणीय पातळीच्या निर्णयन मुल्यांपेक्षा अधिक आहे. यावरुन स्पश्ट होते की, वर्ग १ ली आणि वर्ग ४ थी च्या विद्‌यार्थ्यांमध्ये वर्तन समस्येच्या बाबतीत सार्थक अंतर आहे.

वर्ग पाचवीच्या विद्‌यार्थ्यांच्या गुणांचे मध्यमान १६.३६ आणि प्रमाण विचलन १०.६५ आहे. या दोन वर्गाच्या मध्यमानाचे श't' मूल्य २.४९ आहे. आणि ते ०.०१ लक्षणीय पातळीवर सार्थक आहे. यावरून असे स्पश्ट होते की, वर्ग दुसरीच्या विद्यार्थ्यांचा अपवाद वगळता वर्ग पहिलीच्या विद्‌यार्थ्यांमध्ये इतर वर्गाच्या विद्‌यार्थ्यांपेक्षा सरासरी वर्तन समस्या अधिक दिसून येतात.

### सारणी क्र. 2
### शिक्षकांच्या मुल्यांकनानूसार :– वर्ग 2 आणि 3 ते 5 यांच्या वर्तणूक समस्यांच्या तुलनांचे मध्यमान प्रमाणविचलन आणि श्जश. मुल्य दर्शविणारी सारणी

| वर्ग | एकूण गुण | | 't' मुल्य | df (स्वतंत्र अंश) |
|---|---|---|---|---|
| | मध्यमान | प्रमाणविचलन | | |
| वर्ग २ | १९.९४ | ९.५६ | १२३ | १२४ |
| वर्ग ३ | १७.८१ | ९.४७ | | |
| वर्ग २ | १९.९४ | ९.५६ | २.९९८ | १२३ |
| वर्ग ४ | १४.३९ | १०.४२ | | |
| वर्ग २ | १९.९४ | ९.५६ | १.८८ | ११७ |
| वर्ग ५ | १६.३६ | १०.६५ | | |

*p<0.05,**p<0.01

### स्पष्टीकरण :–

वर्ग दुसरीच्या विद्यार्थ्यांची वर्ग तिसरी, चवथी आणि पाचवीच्या वर्गाच्या विद्‌यार्थ्यांसोबत तुलना केली असता असे दिसून आले आहे की, वर्ग दुसरी आणि तिसरीच्या विद्यार्थ्यांच्या मध्यमानाच्या तुलनेचा श't' मूल्य १.२३ आहे. २ री आणि ४ थी च्या मध्यमानाच्या फरकाचे श't' मूल्य २.९९८ आणि २ री आणि ५ वी च्या मध्यमानाच्या तुलनेचे श't' मूल्य १.८८ आहे यापैकी २.९८८ हे ०.०१ लक्षणीय पातळीवर सार्थक आहे. आणि १.८८ हे श्जश मूल्य ०.०५ लक्षणीय पातळीवर सार्थक नाही. यावरून असे स्पश्ट होते की, वर्ग २ री आणि वर्ग ३ री विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्येचे प्रमाण सारखे आहे. परंतू २ री व ४ थी आणि २ री व ५ व्या वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्येच्या प्रमाणामध्ये सार्थक अंतर आहे. वर्ग दुसरीच्या विद्यार्थ्यांच्या गुणांचे मध्यमान अधिक असल्यामुळे त्यांच्यामध्ये वरील तीनही वर्गाच्या तुलनेत समस्या अधिक दिसून येतात.

**सारणी क्र. 3**
**शिक्षकांच्या मुल्यांकना नुसार :– वर्ग 3 आणि 4 ते 5 यांच्या वर्तणूक समस्यांच्या तुलनांचे मध्यमान, प्रमाणविचलन आणि 't' मूल्य दर्शविणारी सारणी**

| वर्ग | एकूण गुण | | 't' मुल्य | df (स्वतंत्र अंश) |
|---|---|---|---|---|
| | मध्यमान | प्रमाणविचलन | | |
| वर्ग ३ | १७.८१ | ९.४७ | २.१२ | १.५१ |
| वर्ग ४ | १४.३९ | १०.४७ | | |
| वर्ग ३ | १७.८१ | ९.४७ | ०.८७ | १.४५ |
| वर्ग ५ | १६.३६ | १०.६५ | | |
| वर्ग ४ | १४.३९ | १०.४२ | १.१२ | १.४४ |
| वर्ग ५ | १६.३६ | १०.६५ | | |

$*p<0.05, **p<0.01$

***स्पष्टीकरण :–***

वर्ग तिसरीच्या विद्यार्थ्यांची तुलना वर्ग चवथी आणि वर्ग पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या वर्तनसमस्येच्या बाबतीत करण्यात आली आहे. वर्ग तिसरी आणि चवथी वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या मध्यमानाच्या फरकाचे श्जश मूल्य  २.१२ आहे. आणि ते ०.०५ लक्षणीय पातळीवर सार्थक आहे. वर्ग ३ री आणि वर्ग ५ वी च्या विद्यार्थ्यांच्या गुणांच्या मध्यमानाच्या फरकाचे श्जश मूल्य  ०.८७ असून ते ०.०५ लक्षणीय पातळीवर सार्थक नाही. वर्ग ४ थी च्या आणि वर्ग ५ वी च्या विद्यार्थ्यांच्या गुणांच्या मध्यमानाची तुलना केली असता १.१२ इतके श्जश मूल्य  प्राप्त झाले आणि हे श्जश मूल्य  ०.०५ लक्षणीय पातळीवर सार्थक नाही.
यावरून असे स्पष्ट होते की, वर्ग ३ री च्या विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्या वर्ग ४ थी च्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक आहे. आणि वर्ग ३ री आणि वर्ग ५ वी तसेच वर्ग ४ थी आणि वर्ग ५ वी यांच्या वर्तणुक समस्येच्या प्रमाणामध्ये सार्थक अंतर दिसून येत नाही.

### *6) निष्कर्ष*

१) इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांचा अपवाद वगळता इतर वर्गांच्या विद्यार्थ्यांपेक्षा सरासरी वर्तनसमस्या अधिक प्रमाणात दिसून येतात.
२) वर्ग दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांच्या वर्तणुक समस्येचे प्रमाण सारखे आहे. परंतू इयत्ता दूसरी आणि चवथी तसेच दुसरी आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्येच्या प्रमाणामध्ये सार्थक अंतर आहे. इयत्ता दुसरीच्या  विद्यार्थ्यांच्या गुणांचे मध्यमान अधिक असल्यामुळे त्यांच्यामध्ये वरिल तीनही वर्गांच्या तुलनेत समस्या अधिक  प्रमाणात दिसून येतात.
३) इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांच्या वर्तणुक समस्या इयत्ता चवथीच्या विद्यार्थ्यांच्या वर्तणुक समस्येपेक्षा अधिक आहे. तसेच इयत्ता तिसरी व पाचवी आणि इयत्ता चवथी व पाचवीतील विद्यार्थ्यांच्या वर्तणूक समस्येच्या  प्रमाणमध्ये सार्थक अंतर दिसून येत नाही.

### *7) सुचना व शिफारशी :–*

१) प्रत्येक जागरूक पालकांनी व शिक्षकांनी मुलांच्या शालेय प्रगतीलाच महत्व न देता मुलांच्या अंगी असलेले इतर सुप्तगुण निर्मीतीक्षमता यांची जपवणूक केली पाहिजे.
२) पालकांनी आपल्या मुलांच्या मानसिक व शारीरिक क्षमतेच्या पलीकडील अवाजवी अपेक्षा ठेवू नयेत.
३) प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या मित्रमंडळी विषयी व त्यांच्या योग्य–अयोग्य सवयी यांच्या विषयीची माहिती घेऊन योग्य मार्गदर्शन करावे. तसेच मुलांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रेरणा द्यावी.
४) प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्यांच्या आवश्यक त्या गरजा पूरविणे आवश्यक आहे. तसेच शैक्षणिक साहित्स पूरवून विविध स्पर्धेत भाग घेण्यास सतत प्रोत्साहीत करावे.

५) शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता भरपूर शैक्षणिक साहित्य पूरविले जाणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचा उपयोग करण्याची संधी प्रत्येक वयक्तिक व सामुहिकरित्या मिळेल याची काळजी श्शाळेतील शिक्षकांना घेतली पाहीजे.
६) उन्हाळयाच्या सुट्टीत प्रत्येक शाळेत संस्कार व व्यक्तिमत्व शिबिरे आयोजित करावी जेणे करून प्रत्येक विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाची संधी मिळेल.

### ८) संदर्भ :–


१) डॉ. रा. र. बोरूडे – संशोधन पध्दतीशास्त्र, पुणे १ जानेवारी २०१०
२) डॉ. प्रदीप आगलावे – संशोधन पध्दती व तंत्रे विद्या प्रकाशन २००२
३) ज्योती गायकवाड – बालविकासशास्त्र १९९६
४) नलिनी वऱ्हाडपांडे – बालविकास, पिंपळापूरे प्रकाशन, मार्च २०१० ४ थी आववृत्ती
5) Herry E-Garredd – Statistics in pshycology and education
६) हरिभाऊ रा. मोहतुरे – 'असा आमचा भंडारा जिल्हा' नागपूर १९९९
७) डॉ. चंद्रकांत शंकर वागळे – मुले व त्यांचे प्रश्न, पाप्युलर प्रकाशन मुंबई
८) डॉ. इंदिरा खडसे – 'बालविकासशास्त्र' हिमालया पब्लिकेशन हाऊस, पृष्ठ १२३ प्रथमावृत्ती १९९५
९) प्रेमला काळे – 'बालमानसशास्त्र' श्री. विद्याप्रकाशन, नागपूर पृ. १२२ ते ४४.
१०) ज्योती गायकवाड– बालविकासशास्त्र, १९९६

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org